क्र. कार्या-7/गृह/पोल/एसआर- 05/2020
जिल्हादंडाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय,
स्वराज भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर
दिनांक :- 22/03/2020

**(फौजदारी प्रकिया संहिता 1973 मधील कलम 144 प्रमाणे)**

# आदेश

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून संपुर्ण जगात घोषीत केलेला आहे. सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव गतीने पसरत असल्याचे दिसून येत आहे. त्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र शासनाने राज्यात साथीचा रोग प्रतिबंधक कायदा १८९७ दि. १३/०३/२०२० पासून लागु करुन त्यासंबधी अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. भारत सरकार आरोग्य मंत्रालयाने वेगवेगळे आदेश निर्गमीत करुन हा आजार पसरू नये याकरीता लोकांनी एकाच ठिकाणी एकत्रीत येण्यावर, प्रवासावर, वावरण्यावर प्रतिबंध घातलेला आहे. सदर कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता काही अत्यावश्यक प्रतिबंधात्मक आदेश पारीत करणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन कोरोना विषाणूचा होणारा संसर्ग रोखणे व प्रतिबंध करणे शक्य होणार आहे.

आणि ज्याअर्थी, सदर विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी दिनांक 23/03/2020 पासून ते दिनांक 31/03/2020 पर्यंत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 144 नुसार खालील तरतुदीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश होणे गरजेचे आहे असे पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी क्र.जिविशा/कोरोना/सीआरपीसी क्र.144 आदेश/1437/2020, दिनांक 22/03/2020 अन्वये इकडे कळविलेले आहे.

त्याअर्थी, मी, दौलत देसाई भा.प्र.से., जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर, क्रिमिनल प्रोसिजर कोड 1973 मधील कलम 144 अन्वये, मला असलेल्या अधिकारास अनुसरुन, दिनांक 23/03/2020 सकाळी 05.00 वा पासून ते दिनांक 31/03/2020 रोजी रात्री 12.00 वा. पर्यंत कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये खालील कृतींना प्रतिबंध करणारा आदेश निर्गमित करीत आहे.

1) कोल्हापूर जिल्हा कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा ५ पेक्षा अधिंक व्यक्ती एकत्र येतील अशी सर्व प्रकारची सर्व कृत्ये जसे कार्यशाळा, कँप, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणूका, मेळावे, सभा, आंदोलने, सामुहिक सहली, सर्व प्रकारचे सामुहिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यास.

2) जिल्हा, शहर व गावचे कार्यक्षेत्रातुन अत्यावश्यक व तातडीच्या वैद्यकीय व आपत्कालीन परिस्थिती व्यतीरिक्त नागरीक व वाहनांना बाहेर जाणेस व आत प्रवेश करणेस.

3) अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व प्रकारची प्रवासी व माल वाहतूक करणारी वाहने, बस, टेंपोट्रॅव्हलर, ट्रक्स, काळी पिवळी जिप, प्रवासी वाहतूक परवाना असलेली हलकी मध्यम व अवजड वाहने, ॲटो रिक्षा, शेअर ए रिक्षा अशा प्रकारच्या सर्व प्रकारच्या वाहतूकीस.

सदरचे आदेश खालील बाबतीत लागू होणार नाहीत.

1) जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात अधिकारी व कर्मचारी उपस्थितीबाबत कार्यालय प्रमुखांनी निश्चित केलेली कार्यपध्दती व कर्मचारी संख्या,

2) बँका व तत्सम वित्तीय संस्था आस्थापना,

3) आरोग्य यंत्रणा व त्याचे संबंधीत आस्थापना,

4) अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तू उत्पादन, पुरवठा, विक्री, वाहतूक व वितरण यंत्रणा व त्यांना सहाय्य व मदत करणाऱ्या आस्थापना,

5) पोलीस व संरक्षण यंत्रणा व आस्थापना,



Scanned by CamScanner

6) प्रसार माध्यमे, पोस्ट विभाग व आस्थापना,

7) दुरध्वनी, इंटरनेट, मोबाईल आस्थापना.

8) पिण्याच पाणी, स्वच्छता इत्यादी आस्थापना.

9) वैद्यकीय उत्पादने, उत्पादन, विक्री व वाहतूक यंत्रणा.

10) सलग उत्पादन प्रक्रिया सुरु असणारी उत्पादन केंद्रे मर्यादित कालावधीसाठी.

11) अत्यावश्यक सेवेशी निगडीत माहिती व तंत्रज्ञान यंत्रणा व आस्थापना

12) जिल्हादंडाधिकारी यांनी अत्यावश्यक तातडीच्या वैद्यकीय व आपत्कालीन परिस्थितीसाठी जिल्हा, शहरे व गावातील नागरीक व वाहनांचे प्रवेश व निर्गमन करणेस निश्चित केलेली कार्यपध्दती.

तसेच उक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसलेने फौजदारी दंड संहिता 1973 चे कलम 144 (2) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणारी कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहीता 1860 (45) याच्या कलम 188 अन्वये फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी दिला आहे. दि. 22/3/2020.

MAGISTRATE OF THE DISTRICT जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर KOLHAPUR

[दौलत देसाई]
**जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर**

प्रति,

1) सर्व नागरिक व आस्थापना कोल्हापूर जिल्हा

प्रत :-

1) पोलीस अधिक्षक, कोल्हापूर
2) आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
4) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
5) कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
6) मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायती (सर्व)
7) सर्व ग्रामपंचायती
8) जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे उपरोक्त अधिसुचना जनतेच्या माहितीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दैनिकातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी कात्रणासह, प्रसिध्दी अहवाल इकडे पाठविणेत यावा.
9) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

Scanned by CamScanner